संं.फौ.ख.क्र. २७४/२०१५
सरकार-वि- रविंद्र
निशाणी क्र. १४

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची साक्ष.**

**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,</u>**

**<u>नाव</u>** - सुरेंद्र चंद्रपाल कोठारी

**<u>वय</u>** - ३० वर्ष, **<u>व्यवसाय</u> -** काही नाही

**<u>पत्ता</u>** - चनकापूर, तह. सावनेर, जि. नागपूर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एच.ए. डेकाटे यांच्यामार्फत</u>.**

दि. २८.०२.२०१५ रोजी दुपारी १२.३० वाजताच्या दरम्यान माझा मित्र चेतन मालेवार याचा मला कॉल आला की माझा अपघात झाला आहे. त्याने मुन्ना गॅरेज, मिलन चौक, चनकापूर येथील स्थळ सांगितले. मी घटनास्थळी गेलो. मी पाहिले की चेतन उभा होता व त्याच्या दोन्ही हातांवर, खांद्यावर व दोन्ही पायांवर जखमा होत्या. त्याची बहिण पिंकी हिच्या डोक्याला मार लागला होता. मी त्यांना घेवून शांती हॉस्पीटलला गेलो व त्यानंतर वलनी हॉस्पीटलला गेलो. त्यानंतर मी व चेतन मालेवार पोलीस ठाण्यात रिपोर्ट देण्यास गेलो. मी रिपोर्ट दिला. मला रिपोर्ट व छापील प्रथम खबर दाखविण्यात आले. त्यावर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास अनु. **निशाणी क्र. १५ व निशाणी क्र. १६** देण्यात येते. मी आरोपीला ओळखत नाही.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी. वाय. मनपे यांचेमार्फत</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, अपघात कसा झाला व कोणाच्या चुकीमुळे झाला हे मला माहित नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
समक्ष,

SONPARI MAHENDRA GADE
Digitally signed by SONPARI MAHENDRA GADE
Date: 2026.04.21 15:48:01 +0530

(एस. एम. गाडे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
(न्यायालय क्र.०३) सावनेर

सावनेर,
दिनांक २१.०४.२०२६

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF evidence are same word to word, as per the original evidence.

Name of Stenographer :- D. R. Aglawe